RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# उच्च प्राथमिक स्तरावरील हिंदी पाठयपुस्तकातील मूल्यशिक्षणाचा बी.एड. छात्राध्यापकांच्या अध्यापनाचा अभ्यास

**प्रा.सौ शोभा संग्राम पाटील**
सहाय्यक प्राध्यापिका
आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन सातारा

आज आपल्या देशात भ्रष्टाचार ,अनाचार,स्वार्थाधता,काळाबाजार आणि हिंसाचार यांचा सार्वत्रिक संचार प्रत्येक सुजाण नागरिकाला अस्वस्थ करताना दिसतो. देश स्वतंत्र होण्यापूर्वी परकिय सत्ता देशवासियांना लुटत होत्या. आता देशवासियच एकमेकांना लुटत आहेत. दुसरीकडे देशापुढे पर्यावरण संतुलन समस्या प्रदुषण,वाढती बेकारी,वाढती लोकसंख्या,विविध सामाजिक प्रश्न अशा अनेक समस्या आहेत.एकत्र कुटुंब पद्धतीचा –हास होत आहे. आई –वडील नोकरीस किंवा इतर व्यवसायाच्या निमित्ताने घराबाहेर असतात. मुलांच्या या संस्कारक्षम वयात त्यांच्यावर संस्कार कसे होणार ? अर्थातचे हे कार्य शाळेला करावे लागण्याची वेळ आली आहे. संस्कारासाठी व मूल्यविकासासाठी शाळेशिवाय दुसरा पर्याय आता उरला नाही. शिक्षणच साऱ्या  मानव जातीला तारक ठरणार आहे. शिक्षणाचा केंदबिंदू विद्यार्थी तर शिक्षणाचा आत्मा शिक्षक आहे. एकुणच शिक्षण प्रक्रियेत शिक्षकाला अनन्य साधारण महत्व आहे. शिक्षणाची प्रक्रियाच शिक्षकांच्या सक्रिय सहभागाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्याचा आणि जीवनाचा विकास साधण्याचे काम शिक्षकांमार्फत शिक्षण प्रक्रियेतून केले जाते. शिक्षक हा विद्यार्थी परायण असावा, विद्यार्थी हा शिक्षकपरायण असावा शिक्षक आणि विद्यार्थी हे दोघे ही ज्ञानपरायण असावेत आणि शेवटी ज्ञान हे सेवा परायण असावे असे विनोबांनी सांगितले आहे.

एकुणच शिक्षणाचा विस्तार होत असताना शाळा, मुख्याध्यापक,शिक्षक आणि विद्यार्थी यात लक्षणीय वाढ झाली.प्रचंड वाढीमुळे गुणात्मक वाढीकडे जेवढे लक्ष दयावयास हवे होते तेचढे देता आले नाही ही वस्तुस्थिती आहे. शिक्षणाने अक्षर ओळख करुन दिली.लेखन,वाचन,भाषण या कौशल्यांची माहिती दिली.परीक्षा घेतल्या आणि प्रमाणपत्रे दिली. काही प्रमाणात नोकऱ्याही दिल्या. पण या गडबडीत जीवननिष्ठा देण्यात व जीवनमूल्ये रुजविण्यात मात्र शिक्षण यशस्वी झाले नाही जीवनाला हेतू, दिशा आणि गती देणारे मूल्यधिष्ठित शिक्षण देण्याची एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करणाऱ्या भारतासारख्या राष्ट्राला नितांत आवश्यकता निर्माण झाली. मूल्यशिक्षण हा अध्यापनाचा स्वतंत्र विषय होऊ शकत नाही सॉक्रेटिस  ’टपतजनमे बंददवज इम जंनहीजष्सदगुण हे शिकविता येत नाहीत हा विचार चिंतन करावयास लावणारा आहे.वातावरण, सहवास, उपक्रम ,कार्यक्रम, वाचन, मनन ,अनुभव, संस्करण व जीवनसृष्टी यांच्या साहाय्याने मूल्ये आत्मसात करावयाची असतात.

मूल्यांचे विविध प्रकार संभवतात स्वावंलबन,स्वच्छता,श्रमप्रतिष्टा,निर्भयता,खिलाडूवृत्ती, नियमितपणा इत्यादी मुल्यांचा समावेश व्यक्तिगत मूल्यांमध्ये करता येतो. सहकार्य, सर्वधर्मसमभाव राष्ट्रीय एकात्मता, बंधुत्व,समता इ.मूल्ये सामाजिक मूल्ये होत.तर करुणा,भूतदया, निसर्गप्रेम ही मूल्ये निसर्गाच्या संबंधातील आहेत.दैनंदिन अध्यापनातून जी मूल्ये विद्यार्थ्यानी आत्मसात करावयाची असतात त्या मूल्यांशी सुसंगत असे अनुभव विद्यार्थ्याना विविध प्रसंगाद्वारे दयावयाचे असतात. अध्यापनातून काही प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्ष अनुभव विद्यार्थी ग्रहण करीत असतात. अध्यापन करीत असताना शिक्षकाचे अध्यापन कौशल्य,आकर्षक शैली, उदाहरणे,दाखले,दृष्टांत,गोष्टी यांचा मूल्ये रुजण्यासाठी चांगला परिणाम होतो. अध्यापनाच्या वेळी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अनुभवांचा समन्वय छात्रा अध्यापकास साधता आला पाहिजे.

हिंदी विषयाला प्रत्येक घटक शिकविताना कोणते मूल्य संस्कारित करावयाचे आहे याचा विचार त्या शिक्षकांस करावा लागेल. त्यासाठी कोणत्या अध्ययन अनुभूती द्याव्यात हे ठरवावे लागेल.शिक्षकांजवळ चरित्रे सुभाषिते,सुवचने, चित्रे,उदाहरणे,गोष्टी,कविता,श्लोक,प्रार्थना नाटयपूर्ण प्रसंग यांचा संग्रह असला पाहिजे. शिक्षकाने विद्यार्थ्याच्या वर्तनाचा अत्यंत सूक्ष्मपणे आणि सहानुभूतीपूर्ण अभ्यास केला पाहिजे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

त्याचबरोबर ती मूल्ये विविध माध्यमांचा उपयोग करुन प्रभावीपणे विद्यार्थ्यासमोर मांडली पाहिजेत. प्रसंगी अनुभव कथन करुन समाजातील उदाहरणे देऊन दृक–श्राव्य साधनांचा वापर करुन कथाकथन करुन उत्तम विनोद करुन मूल्ये विद्यार्थ्यांना पटवून देणे अपेक्षित आहे.

शालेय पाठयपुस्तकांतून विविध मूल्यांचा अंतर्भाव केलेला असतो संशोधकाचा अध्यापनाचा विषय हिंदी असल्याने हिंदी विषयाच्या पाठयापुस्तकांतून इ.6वी व 8वी च्या अभ्याक्रमातील विविध 10 मूल्ये छात्राध्यापक रुजवतात की नाही व ती कशी रुजवतात हे अभ्यासावे वाटले या कुमारावस्थेमध्ये विद्यार्थ्यांच्या जीवनाला एक दिशा मिळत असते त्यांच्यात जर मूल्ये ख–या अर्थाने रुजली तरच सक्षम राष्ट्रघडणीचे कार्य होऊ शकते. समाजाची आपल्यावर काहीतरी जबाबदारी आहे ही भावना याच वयात मुल्याशिक्षणाच्या माध्यमातून निर्माण होऊ शकते म्हणून उच्च प्राथमिक स्तरावरील हिंदी पाठयपुस्तकातील मूल्यशिक्षणाचा बी.एड्. छात्राध्यापकांच्या अध्यापनाचा अभ्यास करण्याची गरज वाटली.

**उदिदष्टे**

1. उच्च प्राथमिक स्तरावरील हिंदी विषयाला पाठयपुस्तकातील आशयाचे मूल्यांच्या संदर्भात विश्लेषण करणे
2. वर्गामध्ये हिंदी पाठयपुस्तकातील मूल्यशिक्षणाच्या संदर्भात चालणा–या पाठाच्या अध्यापनाचे निरिक्षण करणे
3. मूल्यशिक्षणासंदर्भात हिंदी अध्यापन करताना येणा–या समस्यांचा अभ्यास करणे.
4. मूल्ये रुजविताना राबवले जाणारे उपक्रम केले जाणारे प्रयत्न दिले जाणारे अनुभव व छात्राध्यापक वर्तन यांचा अभ्यास करणे

**गृहितके**

1. हिंदी विषयाच्या पाठयपुस्तकातील आशयामध्ये विविध मूल्यांचासमावेश केलेला आहे.
2. शिक्षकांच्या अध्यापनातून मूल्यशिक्षण प्रभावीपणे देता येते.

**परिकल्पना**

जर हिंदी विषयाच्या पाटांची रचना मूल्यांवर आधारित करुन अध्यापनातून प्रभावी मूल्यशिक्षण दिले तर विद्यार्थ्यांच्या वर्तनामध्ये मोटा बदल होऊ शकतो.

**गरज व महत्व**

मूल्यांचा ऱ्हास होत आहे. पडझड होत आहे. मूल्यांची घसरण होत आहे अशी आरडा ओरडा आपल्याला सगळीकडे ऐकायला येत आहे. या पार्श्वभूमीवर मूल्ये रजविण्याच्या प्रक्रियेचा गांभीर्याने, विवेकाने विचार करुन तशा कार्यक्रमांना शिक्षणात अग्रक्रम देणे आत्यावश्यक ठरते.

1. शिक्षण म्हणजे सुसंस्कार शिक्षण म्हणजे व्यक्तिगत विकास म्हणजेच मनुष्याच्या शारीरिक,मानसिक,भावनिक,नैतिक सामाजिक व आध्यात्मिक अंगाचा विकास असे मानले तर मूल्यशिक्षणाशिवाय पर्याय नाही.
2. मनुष्य भोगवादाच्या कमालीच्या आहारी गेल्यामुळे तसेच लोकसंख्या वाढ आणि इतर अन्य कारणामूळे दीर्घकाळ स्वीकारलेल्या मूल्यांचा ऱ्हास होत आहे या सर्वाना अटकाव घालावयाचा असल्यास मूल्यशिक्षण आवश्यक आहे.
3. संपूर्ण मानवजात आज युद्धाच्या भीती खाली वावरताना दिसते ही त्यांना भेडसवणारी असुरक्षितता नाहीशी करुन या पृथ्वीचे नंदनवन बनवायचे असल्यास मूल्यशिक्षण आवश्यक आहे.
4. आजच्या शिक्षण पद्धतीत धर्मातीतता,सामाजिक न्याय, वैचारिकसुसंगता, तर्कनिष्टाविचार ,वैयक्तिकप्रतिष्टा, लोकशाहीबद्दल आदर यांचे पुरेसे बीजारोपण होण्यासाठी मूल्यशिक्षण आवश्यक आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

याचाच अर्थ जीवन,सत्य,शिव,सुंदरम् बनवून जीवनमान उंचवण्यासाठी मूल्यशिक्षण आवश्यक आहे. स्वयंसिद्ध व इष्ट अशा ध्येयांचा किंवा आदर्शाचा समावेश मूल्य या संज्ञेत आहे. ते आदर्श मनुष्याने साध्य केले तर मनुष्याला अत्युच्च वाटणाऱ्या गोष्टीच्या परिपूर्ततेचे समाधान लाभते कारण मूल्ये प्रत्येक व्यक्तीला जीवनातील मार्गदर्शक तत्वे आहेत. जी व्यक्तीला तिच्या संस्कृतीला अनुसरुन शारिरीक मानसिक स्वास्थाला तसेच समाजहिताला व समायोजनाला उपयुक्त ठरतात अशा प्रकारे मानवी जीवनाला मूल्यांचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. तर पशूचे नरात रुपांतर करण्याचे सामर्थ्य मूल्यांत आहे.

प्रस्तुत संशोधन हे वर्तमानकालीन उच्च प्राथमिक स्तरावरील हिंदी पाठयपुस्तक मूल्यशिक्षणाशी निगडीत असल्याने मूल्यशिक्षणाची सद्यःस्थिती तपासून पाहण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील शालेय सर्वेक्षण पद्धतीचा वापर संशोधनासाठी केला आहे  या संशोधनात प्रश्नावली पडताळा सुची या साधनांचा वापर करण्यात आला आहे आझाद कॉलेज ऑफ एज्यूकेशन सातारा या महाविद्यालयातील हिंदी विषय शिकविणा—या छात्राध्यापकांचा समावेश या संशोधनात केला आहे.

इयत्ता 6 वी ते 8 वी या वर्गाना हिंदी विषयाचे अध्यापन करणार 20  छात्राध्यापक आहेत या सर्व छात्राध्यापकांचाा समावेश केला आहे छात्राध्यापकांच्या अभिरूप पाठ, सराव पाठ, शालेयअनुभवांतर्गत पाठ या सर्व पाठांचा समावेश संशोधनात केला आहे सराव पाठांच्या माध्यमातून उच्च प्राथमिक शाळांतील द. 6वी ते 8 वी या वर्गांना हिंदी विषय शिकविणा—या सर्व छात्राध्यापकांस प्रश्नावली भरुन धेण्यात आल्या व 20 छात्राध्यापकांच्या पाठाचे निरीक्षण करण्यास आले.

छात्राध्यापकांना देण्यात आलेल्या प्रश्नावलीला उत्तम प्रतिसाद मिळाला या प्रतिसादाचे प्रत्येक प्रश्नाचे कोष्टक तयार करण्यात आले.या प्रतिसादाचे शेकडा प्रमाण काढण्यात आले. प्रत्येक प्रश्नाच्या तयार झालेल्या कोष्टकावरुन विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले.

तसेच छात्राध्यापकांच्या पाठांचे निरीक्षण (सराव पाठ,शालेय अनुभवांतर्गत पाठ, आशययुक्त पाठ) करण्यात आले. या निरीक्षणानुसार केलेल्या नोंदीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले.

**निष्कर्ष**

1. हिंदी विषयासाठी आवश्यक असलेली पूस्तके ,मासिके,संदर्भ पुस्तकें,शब्दकोश व इतर साहित्याचा वापर अध्यापनासाठी करतात असे 95 टक्के छात्राध्यपकांनी म्हटले आह.
2. विद्यार्थ्यांमध्ये मूल्ये रुजविण्यासंदर्भात हिंदीच्या पाठांच्या अध्यापनासाठी नियोजन करताना 100 टक्के छात्राध्यापक पाठटाचन काढतात. एकंदरीत छात्राध्यापक विद्यार्थ्यामध्ये मूल्ये रुजविण्यासाठी पाठ टाचणात त्याप्रमाणे नोंदी करतात.
3. विद्यार्थ्यांमध्ये व्यक्तिगत भेद बघता कोणत्या पद्धतीने शिकवावे ही समस्या छा़त्राध्यापकांना जाणवते तसेच मूल्ये रुजविण्यासंबंधी अध्यापन करताना जाणचणा—या समस्यांमध्ये कौटुंबिक,आणि आजूबाजूच्या परिसराचा प्रभाव विद्यार्थ्यांवर अधिक पडतो असे छात्राध्यापक प्रतिसादावरुन स्पष्ट होते.
4. पाठयपुस्तकातील मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये संक्रमिक करण्यासाठी शालेय अनुभव कार्यक्रमांतर्गत अभ्यासपूरक व अभ्यासोतर कार्यक्रमाचे आयोजन केले जाते असे जाते असे 100 टक्के छात्राध्यापकांचे म्हणणे आहे. यामध्ये जयंती—पुण्यतिथी, वर्गसजावट, शैक्षणिक सहली, विविध स्पर्धा, परिपाठ, विज्ञान प्रदर्शन, समाजसेवा सांस्कृतिक कार्यक्रम, वृक्षारोपण हे उपक्रम विदयार्थ्यांमध्ये मूल्ये रूजविण्यासाठी अधिक प्रमाणात घेतले जाते असे 100 टक्के छात्राध्याकांनी म्हटले आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**पाठ निरिक्षणावरुन निष्कर्ष**

1. पाठात जे मूल्य आहे त्याचे नाव पाठ शिकवित असताच स्पष्टपणे सांगितले जात नाही. तर अप्रत्यक्षपणे मूल्ये रुजविण्यासाठी अध्ययन अनुभव दिले जातात.
2. मूल्यांचे स्पष्टिकरण करताना गोष्ट सांगून मूल्ये रुजवणाचा छात्राध्यापकांचे प्रमाण निम्म्यापेक्षा जास्त आहे इतर साहित्याचा वापर करण्याचे प्रमाण मात्र गोष्टीपेक्षा खूपच कमी असल्याचे दिसून आले
3. जास्तीत जास्त छात्राध्यापक एखादया मूल्याबाबत व्यवहारात कसे वर्तन करावे हे प्रत्येक पाठात सांगायच्या असतात असे पाठनिरीक्षणावरुन दिसते
4. मागील पाठातील मूल्ये रुजलेली पाहण्यासाठी जवळ–जवळ निम्मे छात्राध्यापक विद्यार्थ्यांना प्रश्न विचारतात.